# निसर्गरम्य कोकण सहल (२६-०५-९३ ते १-६-९३)

शेवटी एकदाचे आमचे जायचं-नाही जायचं असं होत होत आम्ही रविवार दि. २६ मे ९३ ला कोकण सहलीसाठी घरातुन पहाटे ५.१५ ला निघालो. रिक्षाने मुंबई नाक्यावरील हॉटेल किनारा इथे पोहचलो. सहल 'कोकण विकास पर्यटन' नाशिक ह्यांनी आयोजीत केली होती. किनारा हॉटेलला त्यांची १६ सिटस् ची बस व इतर पर्यटक ५.४५ ला जमायचे होते. आम्ही तिथे पोहचलो तेव्हा ना तिथं कुणी पर्यटक ना आमची बस! मनात एकदम पाल चुकचुकली, निदान आता ही तरी आमची सहल होते की नाही. कारणही तसेच होते. ऑक्टोबर ९२ मधे 'अथर्व ट्रॅव्हल्स', पुणे ह्यांच्यामार्फत आम्ही राजस्थान सहलीला जाणार होतो पण ऐनवेळी ह्या कंपनीने सहल रद्द केली होती. त्यानंतर आम्ही जानेवारी ९३ मध्ये 'केसरी' तर्फे मे ९३ मध्ये 'काश्मीर' सहलीला जाणार होतो. पण मार्चमधेच घरच्या काही कारणांमुळे आम्ही सहलीला जायचे नाही असे ठरवले. त्यामुळे ह्यावेळी आमची सहलीच काय हा प्रश्न पडला. कंपनीचे श्री. भालेराव ह्यांना फोन लावला. त्यांनी बस येईलच असे आश्वासन दिले. १० मिनिटांनी बस आली आणि टिपीकल नाशिककर जसे ९.३० च्या तारकाला १० वाजेपर्यंत पोहचतात त्याप्रमाणे एक-एकजण साधारणतः ६.१५ पर्यंत आले. आम्ही मात्र 'साने' ५.३० वाजताच पोहचलो होतो. तसा मी वेळेबाबत नाशिककरच आहे पण आमच्या सौ. व चिरंजीव मात्र वेळेबाबत अतिशय दक्ष असतात. असो. तर आम्ही सर्व १२ जणं (ह्यात ८ बायका-मुली), आमचा सारथी अकिल शेख व गाईड निलेश गावडे असे १४ जण नाशिकहून निघालो. एकंदर ६ कुटुंब होतो, आम्ही तिघे, कुलकर्णी पती-पत्नी, देशपांडे सासू-सून, कासार बाई व त्यांच्या २ मुली भसाळे बाई एकट्या व बाळ सावंत हे पण एकटेच. हे दोघेही जेष्ठ नागरिक. प्रवास सुरू झाल्यावर हळूहळू गप्पा सुरू झाल्या. सकाळचे प्रसन्न वातावरण आणि ६ लेनच्या नाशिक-मुंबई रा. मा. ३ चा सुंदर रस्ता, शहापूर केव्हा आले ते समजलेच नाही. पडघ्याजवळ धिंग्रा रेस्टॉरंटला सकाळची न्याहरी झाली. गाडी मग कल्याण-डोंबिवली-शीळफाटा-तळोजा मार्गे पनवेल-मार्गे मुंबई-गोवा N.H.17 मार्गाने पेण व नंतर नागोठण्याला पोहचली. नागोठण्याला हॉटेल इंद्रप्रस्थ इथे दुपारचे जेवण घेऊन आम्ही माणगांवला पोहचलो. इथे गाडीत डिझेल भरून लगेचच ती श्रीवर्धन रस्त्याला महामार्ग सोडून वळली. नंतरची सर्व सफर कोकणातील अंतर्गत रस्त्यांनीच झाली. म्हसळामार्गे आम्ही दुपारी ४ पर्यंत दिवेआगर येथील परवर्धन ह्यांच्या 'ऑम्बियन्स् कॉटेज' मधे पोहचलो. प्रत्येक कुटुंबास स्वतंत्र कॉटेजमधे राहण्याची व्यवस्था. दिवसभराचा प्रवास, त्यामुळे A.C. रूमसमध्ये १५-२० मिनिटे आराम करून लगेच चहासाठी सर्वजण जमलो. चहा घेऊन जवळच असलेल्या व अतिशय प्रसिद्ध असणाऱ्या दिवेआगरच्या गणपतीमंदीरात पायीच पोहचलो. इथला गणपती ३॥ किलो सोन्याचा, द्रौपदी धर्मा पाटील ह्या महिलेला तिच्या सुपारीच्या बागेत एक दिवशी सापडला. बाईंनी तो गावांतील बापट ह्यांचे मंदीरात १९९७-९८ मध्ये अर्पण केला. अर्थात मागच्या वर्षीच आपल्या एकंदरच भोंगळट कारभारामुळे चोरट्यांनी ही सोन्याची मुर्ती पळवून नेली. काही दिवसांनी चोरटे सापडले पण सोनेमात्र वितळून टाकलेले. त्यामुळे फोटोत दिसणारी ही अतिशय मोहक अशी मुर्ती प्रत्यक्ष बघण्याचे आमाला भाग्यात नव्हते. असो. भारतात अश्या ज्या काही चांदी-सोन्याच्या मुर्ती-देवळ आहेत ते चोरी होण्यापुर्वी बघितलेले बरे.